**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर**

**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
**यशवंतराव चव्हाण भवन**
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/७६३/१४**
**पुणे १ दिनांक :- २५/०३/२०१४**

**प्रति,**
**अध्यक्ष/सचिव,**
**कै. दिनकरराव जेधे पाटील प्रतिष्ठाण,**
**राधाकृष्णनगर, भोसरी, पुणे.**

**विषय:-** सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

**संदर्भ:-** १) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण (क्र. १ ,६ व २४) २०१२.
२) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचा शासन निर्णय क्र. स्वयंअ. २०१३/ (८५/१३)II/ माशि-१, दिनांक ०५ ऑक्टोबर २०१३
३) मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. शिउसं/प्राथ-२/ स्वयंअशाळा/मान्यता /पुवि/१३/ ३११६९/७२ दि. ०२ डिसेंबर २०१३
४) मा.शिक्षण संचालक, (माध्य व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील आदेश क्र.अमाशा/स्वयंअर्थ/ २०१३/ १५-क (५) १०८४२ दि.२० नोव्हेंबर २०१३

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर **नवीन शाळा स्थापना** करणे, तसेच **विद्यमान शाळेचा दर्जावाढ** करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयानुसार **नविन शाळा स्थापन करणेकरिता /विद्यमान शाळेचा दर्जा वाढ करण्याकरिता खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

| अ.क्र. | मुळ यादीतील क्रमांक | संस्थेचे नाव व पुर्ण प त्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | सुरु असलेल्या वर्गासहीत | शाळा सुरु केल्याचा दिनांक | नविन शाळा/ दर्जा वाढ | शाळेचा प्रकार (प्राथमिक/उच्च प्राथमिक) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | २०१ | **कै. दिनकरराव जेधे पाटील प्रतिष्ठाण, राधाकृष्णनगर, भोसरी, पुणे .** | **प्रिती इंग्लिश स्कूल, मोशी, गायकवाड वस्ती, ता.हवेली, जि.पुणे** | इंग्रजी | इ.१ ली ते इ. ४ थी | जून २०१३ पासून | नवीन | प्राथमिक |

**अटी व शर्ती**

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
४. संदर्भ क्रमांक ०४ अन्वये सन २०१३-१४ मध्ये सुरु असलेल्या वर्गासह परवानगी देण्यात येत आहे.
५. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
७. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **UDISE** मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

प्रत माहितीसाठी सविनय सादर-
१. **मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.**
२. **मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.**
३. **मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.**
४. **मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-०१.**
५. **प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे**

**स्वयं अर्थसहाय्यित शाळा**
(मराठी, **इंग्रजी**, हिंदी, उर्दू, तामिळ इत्यादी माध्यम)

**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
**यशवंतराव चव्हाण भवन**
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/४९/२०१५**
**पुणे १ दिनांकः-२० /०१/२०१५**

**प्रति,**

**मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,**
कै.दिनकररा जेधे (पाटील) प्रतिष्ठाण संचलित,
प्रिती इंग्लिश मिडीयम स्कूल.

**विषयः-** स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ज्यादा/**नैसर्गिक वाढीचा**/वाढीच्या प्रथम/जादा तुकडया/अतिरिक्त तुक्रडी वाढ वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.

**संदर्भः-** १) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण (क्र. १ ,६ व २४) २०१२.
२)महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचा शासन निर्णय क्र. एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम-२, दि.२६फेब्रुवारी २०१४
३)मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. शिउसं/प्राथ-३/ १२ स्वयंअशाळा/मान्यता /पुवि/१३/ ३११६९/७२, दि. २डिसेंबर २०१३
४)मा.शिक्षण संचालक, (माध्य व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील आदेश क्र.अमाशा/स्वयंअर्थ/ २०१३/ १५-क (५) १०८४२ दि.२० नोव्हेंबर २०१३

उपरोक्त विषयासंबधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रसताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या **नैसर्गिक** /अतिरीक्त वाढीचा /जादा तुकडया /वर्ग **सन २०१४ -२०१५** या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी क्रमांक | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **प्रिती इंग्लिश मिडीयम स्कूल,मोशी ,गायकवाड वस्ती ता हवेली जि पुणे** | **इंग्रजी** | **इयत्ता ५ वी ते इ.८ वी** | **१ ली तुकडी** | **नैसर्गिक तुकडी वाढ** | **स्वयं अर्थसहाय्यित शाळा तत्वावर मंजूर** |

अटी व शर्ती

१) शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हततेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
२) सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३) सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६) सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७) तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असलेची निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८) पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

**प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**
**१. सचिव / अध्यक्ष** कै.दिनकररा जेधे (पाटील) प्रतिष्ठाण संचलित,
**२. मुख्याध्यापक :-** प्रिती इंग्लिश मिडीयम स्कूल, ता हवेली जि पुणे